V 891.461
Bhu
50488

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY
LIBRARY

24 APR 19

अथ भूपाळ्या प्रारंभ.

किंमत एक आणा.

MEN'S UNIVERSITY
24 APR 1972
50488
20/4/
15.6
13
00/5

श्री

अथ भूपाळ्या प्रारंभ.

अथ भूपाळी गणपतीची.

श्रीगणेशायनमः ॥ ॥ उठाउठाहोसकळिक ॥ वाचे स्मरावागजमुख ॥ सिद्धिबुद्धीचानायक ॥ सुखदायकभक्तांसी ॥ १ ॥ आंगीशेंदुराचीउटी ॥ माथांशोभतसेकीरिटी ॥ केंशरकस्तूरीलल्लाटीं ॥ कंठींहारसाजिरा ॥ २ ॥ कानीं-कुंडलांचीप्रभा ॥ चंद्रसूर्यजैसेनभा ॥ माजीनागबंदीशोभा ॥ स्मरतांउभाजवळीतो ॥ ३ ॥ कासेपीतांबराचीधटी ॥ हातींमोदकाचीवाटी ॥ रामानंदस्मरतांकंठीं ॥ तोसंकटींपावतो ॥ ४ ॥

भूपाळी गणपतीची.

विद्याधराविनायका ॥ ऋद्धिसिद्धीच्यानायका ॥ वक्राननातूंसुखदायका ॥ ध्यायकहृदयींहृदयस्थ ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ हेसच्चिदानंदामुळस्तंभा ॥ अचलासगुणमूर्तिस्वयंभा सकळाआदीप्रियप्रारंभा ॥ तुजहेरंबानमोस्तुते ॥ २ ॥ जयसिंदुरारिप्रियसिंदुरा ॥ चर्चिततनुभूषितसुंदरा

॥ भक्तिमंदिरांगणमांदारा ॥ मूषकवाहनाजगद्गुरू ॥ ३ ॥ मंगळमुर्तीमंगळनामा ॥ मंगळकारकमंगळधामा ॥ भक्त जनाच्याहृदयारामा ॥ मनविश्रामाविघ्नहरा ॥ ४ ॥ हेत्रिपुरांतकत्रिभुवनभूपा ॥ त्रिकाळत्रिदशध्यानअमुपा ॥ त्रिबकविनयीत्रितापदर्पा ॥ करींकृपाश्रीएकाद्विजा ॥ ५ ॥

भूपाळी गणपतीची.

उठिंउठिंबालंबोदरा ॥ चौदाविद्यागुणगंभीरा ॥ हरणकर्ताविघ्नेश्वरा ॥ मोरेश्वरादीनबंधू ॥ १ ॥ धृ० ॥ तुझेनामघेतांआधीं ॥ सकळहरतीआधिव्याधी ॥ प्राप्त होतीऋद्धिसिद्धी ॥ दयानिधीगजानना ॥ २ ॥ सरळशुंडाअलोलिक ॥ मस्तकींमुकुटतेजाधिक ॥ झळकतसिंदुराचाटीळक ॥ लज्जितमृगांकपाहोनी ॥ ३ ॥ निर्जरसर्वहीमिळुनआले ॥ द्वारींतिष्ठतांभागले ॥ तुझें स्वरूपचांगलें ॥ मनींभरलेंसर्वांच्या ॥ ४ ॥ नारदतुंबुरगायनकरी ॥ ऋद्धिसिद्धिजोडुनिकरी ॥ त्यांच्याकायातूंसाहाकारी ॥ होउनिइच्छापुरवीसी ॥ ५ ॥ उठाउठासकळलोक ॥ आधींस्मरागणनायक ॥ प्रपंचअवघाहामायिक ॥ नदिसेसुखपळएक ॥ ६ ॥ वरुणयमराजाइंद्र ॥ व्यासशुकतोयोगींद्र ॥ भावेंस्मरतीभालचंद्र ॥ तोभोगींद्रमाता

ळीं ॥ ७ ॥ उठोनिवेगींएकरदन ॥ दिधलेंसकळांसीदर्शन सुखीकरूनीसुरवरगण ॥ जीवनसुतासींअश्वासीं ॥ ८ ॥

भूपाळी गंगेची.

उठोनियांप्रातःकाळीं ॥ वदनींवदाचंद्रमौळी ॥ श्रीविंदु माधवाजवळी ॥ स्नानकरागंगेचें ॥ १ ॥ धृ० ॥ भागीरथी चेंस्नानकरा ॥ हृदयींस्मरागंगाधरा ॥ चुकेलचौऱ्यांशीचा फेरा ॥ ऐसेंमहात्म्यगंगेचें ॥ २ ॥ गंगाआहेस्वर्गावरुती ॥ पाताळींआहेभोगावती ॥ मृत्युलोकींहेविख्याती ॥ ऐसें महात्म्यगंगेचें ॥ ३ ॥ ब्रह्माविष्णुसूर्यचंद्र ॥ सीतापतीरा मचंद्र ॥ परिवारेंसींराजाइंद्र ॥ स्नानकरीगंगेचें ॥ ४ ॥ नारदवासिष्ठगौतममुनी ॥ अत्रिसुमंतुआणिजैमिनी ॥ ध्रुव दत्तयेतीमाध्यान्हीं ॥ स्नानकरितीगंगेचें ॥ ५ ॥ मत्स्यकू र्मवराहनरहरी ॥ वामनपरशुरामश्रीहरी ॥ बौद्धकलंकीअ वधारीं ॥ करितीस्नानगंगेचें ॥ ६ ॥ दुर्गादिमायासर स्वती ॥ सावित्रीलक्ष्मीपार्वती ॥ गंगापूजनआदरेंक रिती ॥ ऐसेमाहात्म्यगंगेचें ॥ ७ ॥ स्नानदानजपकरी ॥ घडल्याभागीरथीचेतिरीं ॥ त्यावरीश्रीहरीकृपाकरी ॥ ऐसेमाहात्म्यगंगेचे ॥ ८ ॥ गंगाथोरयात्रिभुवनीं ॥ गंगाये इलज्याच्यावदनीं ॥ तोसुटेलसंसारापासोनी ॥ ऐसेमा० ॥

॥ ९ ॥ राधाह्मणेश्रीहरिचला ॥ काशीक्षेत्रींअघटित लीला ॥ पाहूंपंचगंगेचामेळा ॥ स्नानकरूंगंगेचें ॥ १०॥ निरातापीइंद्रायणी ॥ प्रवरासर्वपापहारिणी ॥ चंद्रभागा विठ्ठलचरणीं ॥ स्तवनकरागंगेचें ॥ ११ ॥ कृष्णावेण्या तुंगभद्रा ॥ फल्गूकावेरीनर्मदा ॥ भीमाभामामुख्यगोदा स्तवनकारितीगंगेचें ॥ १२ ॥ आलीआषाढीएकादशी ॥ चलाजाऊंपंढरीसीं ॥ भेटूंविठ्ठलरखुमाईसीं ॥ दासाविन वीयावाचे ॥ १३ ॥

भूपाळी घनःश्यामाची.

घनश्यामसुंदराश्रीधराअरुणउदयझाला ॥ उठींलौक रींवनमाळीउदयाचळींमित्रआला ॥ धृ० ॥ सायंकाळीं एकेमेळींद्विजगणअवघेवृक्षिं ॥ अरुणउदयहोतांचिउडा लेचरावयापक्षी ॥ अघमर्षणादिकरुनितापसीतपाचरण दक्षी ॥ प्रभातकाळींउठुनिकापडीतीर्थपंथलक्षी ॥ करुनी सडासंमार्जनगोपीकुंभघेउनिकुक्षी ॥ यमुनाजळासिजातिमु कुंदादध्योदनभक्षी ॥ मुक्तहोउंपाहेकमळीणीपासूनभ्रमरा॥ पूर्वदिशेमुखधूतलेंहोतसेनाशातिमिरा ॥ उठलौकारिगोविंदा सांवळ्यानंदकुमरा ॥ चाल ॥ मुखप्रक्षालनकरींअंगिकारी भाकरकाला ॥ उठिलौ० ॥ १ ॥ घरोघरींदीपअखंडत्यां

च्यासरसावुनिवाती ॥ गीतगातिसप्रेमेंगोपीसदनायेतीजाती ॥ प्रवरतोनिगृहकामीरंगमाळाघालूंपाहती ॥ आनंदकंदा प्रभातझालीउठसरलीराती ॥ कांढींधारक्षीरपात्रेंघेउनी धेनुहंबरताती ॥ द्वारींउभेगोपाळहाकामारुनीतुजलाबहाती ॥ चाल ॥ हेमुक्तहारकंठींघालींयारंगमाळा ॥ हातींवेत्र काष्ठबरवेंकांबळाघेईकाळा ॥ ममआत्मजमधुसूदनात्दपीके शजगपाळा ॥ लक्षितातिवासरेंहरिधेनुस्तनपानाला ॥ उ ठिलौ० ॥ २ ॥ प्रातःस्नानेंकरूनिगोपिकाअलंकारनटती॥ कुंकुमादिचर्चुनीमंथनालागिंआरंभिती ॥ प्रेमभरितअंतरांत वदनींनामावळीगाती ॥ अर्घ्यदानदेउनियांद्विजगणदेवा र्चनकरती ॥ नेमनिष्ठवैष्णवतेविष्णुपूजासमार्पिती ॥ स्मार्त शिवार्चनशाक्तशक्तीआराधिती ॥ चाल ॥ ऋषिगणआश्र मवासीजेनिरंजनींधाले ॥ अरुणोदयींआपुलालेध्यानींम ग्नझाले ॥ पंचपंचउषःकालींरविचक्रनिघोंआलें ॥ एवढा वेळनिजलासिह्मणुनहरीसमजेलनंदाला ॥ उठिलौ० ॥ ३॥ विद्यार्थीविद्याभ्यासास्तवसादरगुरुपायीं ॥ अध्यापनगुरुक रितोशिष्यअध्ययनउदयीं ॥ याज्ञिकजनकुंडींआहुतीटाकि तातिपाहीं ॥रविप्रकाशपडुनियांउजळल्याशुद्धदिशादाही॥ हेमाझेपाडसेसांवळेउठकृष्णाबाई ॥ सिद्धसवेंबळिरामघेउ नीगोधनेंवनाजाईं ॥चाल॥ मुनिजनमानसहंसागोपीमनक

मळभृंगा ॥ मुरहरपंकजपाणीपद्मनाभाश्रीरंगा ॥ शकटांत कसर्वेशाहेहरिप्रतापभृंगा ॥ कोटितेजाहुनितेजआगळेंतवव दनाला ॥ होनाजिबाळनित्यध्यातसेहृदयीं नाममाळा ॥ उठिलौ० ॥ ४ ॥

भूपाळी दशावताराची.

जनह्मणाहोश्रीहरी ॥ प्रातःकाळींस्मरणकरी ॥ तेणेंतराल भवसागरीं ॥ हानिर्धारींभरंवसा ॥ धृ० ॥ वेदनेलोनिशाच रीं ॥ मत्स्यरूपझालेहरी ॥ कार्यब्रम्हयाचेंकरीशंखासुरव धोनियां ॥ २ ॥ दैत्यमातलेभूमंडळी ॥ पृथ्वीनेलीरसात ळीं ॥ कूर्मरूपेंहोवनमाळी ॥ पृथ्वीधरिलीमेदिनी ॥ ३ ॥ महीडळमळलीपाहाहो ॥ देवझालेवराहो ॥ मगवधिलेदै त्यदानवो ॥ पृथ्वीदाढेधरुनियां ॥ ४ ॥ पुत्रापित्यानें गांजि ला ॥ तोनरहरीस्मरताझाला ॥ स्तंभीअवतारधारिला ॥ भक्तरक्षिलाप्रल्हाद ॥ ५ ॥ यागकरिताझालाबळी ॥ इंद्र कापिन्नलाचळाचळीं ॥ वामनरूपेंहोवनमाळी ॥ घालीपा ताळींबळिराजा ॥ ६ ॥ रेणुकेउदरींभार्गवजाहले ॥ राजेस मस्तसंहारिले ॥ राज्यब्राम्हणादीधलें ॥ सुखीकेलेभूदेव ॥ ७ ॥ सूर्यवंशींरघुनंदन ॥ वानरसैन्यमिळवून ॥ सागर पाषाणींबांधून ॥ संहारिलेंराक्षसां ॥ ८ ॥ कारागृहींअव

तरले ॥ श्रीकृष्णगोकुळींवाढिन्नले ॥ कंसचाणूरमार्दिले ॥ राज्यींस्थापिलेंउग्रसेना ॥ ९ ॥ बौध्यअवतारधारिला ॥ जनहाबहुतकष्टीझाला ॥ मगकलीसवरदीधला ॥ आपण राहिलानिद्रिस्थ ॥ १० ॥ पुढेंकलंकीहोणार ॥ ऐसाशास्त्राचानिर्धार ॥ मगफिटेलभवसंदेह ॥ याहीविश्वजनाचा ॥ ११ दशअवतारभूपाळी ॥ नित्यस्मरतांप्रातःकाळीं ॥ दासम्हणेहोभूमंडळीं ॥ भाग्यवंतगातील ॥ १२ ॥

भूपाळी ज्योतिलिंगाची.

सत्यज्योतिलिंगेंबारा ॥ प्रातःकाळींस्मरणकरा ॥ कोटि कुळेंहीउद्धरा ॥ भवहातरालबापानो ॥ १ ॥ धृ० ॥ बारा णसीविश्वनाथ ॥ मोक्षदातातोसमर्थ ॥ पुरविलअंतरींचा अर्थ ॥ सोमनाथसोरटी ॥ २ ॥ ओंकारममलेश्वर ॥ सेतु बंधरामेश्वर ॥ भीमाउगमीभीमाशंकर ॥ घृष्णेश्वरवेरुळीं ॥ ३ ॥ नागनाथअमृतोदकीं ॥ विश्वजनकेलेसुखी ॥ परळी वैजनाथम्हणतांमुखीं ॥ सुकृतसांचेजन्माचें ॥ ४ ॥ त्र्यंबक हातीर्थराज ॥ पुरवील अंतरींचेंकाज ॥ त्याहीतेजामाजी तेज ॥ महाकाळउज्जयिनी ॥ ५ ॥ दुजेंकैलासभुवन ॥ श्री शैल्यमल्लिकार्जुन ॥ वाचेस्मरतांधन्यधन्य ॥ अनुपम्यक्षेत्र हें ॥ ६ ॥ बद्रिकेदारउत्तरे ॥ ज्याचेस्मरणेंभवहातरे ॥ घ्या

नधरिल्यावृत्तीनुरे ॥ निजनिश्चळदासासीं ॥ ७ ॥ नरहरि म्हणेजन्मायावें ॥ शुद्धसत्वप्रेमभावें ॥ वाचेहरिगुणगावे॥ धालोकृपेंसर्वदा ॥ ८ ॥

भूपाळी रामाची.

रामसर्वांगींसांवळा ॥ हेमअलंकारपिंवळा ॥ नानारत्नाची यामाळा ॥ अळंकारशोभती ॥ धृ० ॥ १ ॥ पिंवळामुकुट कीरिटी ॥ पिंवळेंकेंशरलल्लाटीं ॥ पिंवळ्याकुंडलांचीथाटी ॥ पिंवळ्याकंठींवनमाळा ॥ २ ॥ पिंवळाकांसेपीतांबर ॥ पिंवळाब्रीदाचातोडर ॥ पिंवळ्यांघंटाचागजर ॥ पिंवळ्या वाक्यारुणझुणती ॥ ३ ॥ पिंवळेंपदककरभूषण ॥ पिंवळें हातींवीरकंकण ॥ पिंवळ्यामुद्रिकांचेंलेणें ॥ पिंवळेंकरींश रचाप ॥ ४ ॥ पिंवळामंडपविस्तीर्ण ॥ पिंवळेंमध्येंसिंहासन ॥ रामसीतालक्ष्मूमण ॥ दासगुणगातसे ॥ ५ ॥

भूपाळी रामाची.

उठोनियांप्रातःकाळीं ॥ जपारामनामावळी ॥ स्वयेंध्या तोचंद्रमौळी ॥ शैलबाळीसमवेत ॥ १ ॥ धृ० ॥ रामयो ग्यांचेंमंडण ॥ रामभक्तांचेंभूषण ॥ रामधर्माचेंरक्षण ॥ सं रक्षणदासांचें ॥ २ ॥ रामेंताटिकावधियेली ॥ रामेंशिळा उद्धरिली ॥ रामेंजानकीजिंकिली ॥ मुक्तकेलीगणिका ॥

३ ॥ रामेंपाषाणतारिले ॥ रामेंदैत्यसंहारिले ॥ रामेंबंदसोड विले ॥ सुखीकेलेसुरवर ॥ ४ ॥ रामेंरक्षिलेंभक्तांसी ॥ रामेंसोड विलेदेवांसीं ॥ रामभक्तांचेंमानसीं ॥ रामदासींआनंद ॥

भूपाळी रामाची.

सूर्यवंशींवंशावळी ॥ राजेझालेभूमंडळीं ॥ स्मरात्यांची नामावळी ॥ उदयकाळींभानूच्या ॥ १ ॥ ध्रु० ॥ सूर्यवं-शींमनूजाहला ॥ त्याचाइक्ष्वाकूजन्मला ॥ तेथुनिवंशावि स्तारला ॥ पृथूजाहलामहीपाळ ॥ २ ॥ उत्तानपादराजा थोर ॥ ध्रुवअढळपदींनिर्धार ॥ धुंधुमारत्याचापुत्र ॥ राजे पवित्ररविवंशीं ॥ ३ ॥ मांधातापुण्यश्लोक ॥ शिबिझाला सात्विक ॥ हरिश्चंद्रतोधार्मिक ॥ राजेअनेकसत्वस्थ ॥४॥ रुक्मांगदत्याचेवंशीं ॥ व्रतपाळीएकादशी ॥ धर्मांगदत्या चेकुशीं ॥ अंबरीषव्रतवंत ॥ ५ ॥ सगराकरितांसागरह्मण ती ॥ भगीरथेंआणिलीभागीरथी ॥ तेथूनककुत्स्थउत्पत्ती॥ रामह्मणतीकाकुत्स्थ ॥ ६ ॥ दिलीपराजाबहुभला ॥ त्या चापुत्ररघुशोभला ॥ तयापासुनीअजजाहला ॥ जोवर्णिला ऋषिवर्यें ॥ ७ ॥ दशरथवंशींपुत्रच्यारी ॥ श्रीरामजडजी वांउद्धरी ॥ पुढेंकुशाचेउदरीं ॥ कलिनाशनऋतुपर्ण ॥ ८ ॥ ऐसेराजेप्रतापकीर्ति ॥ भास्करवंशींचीउत्पत्ति ॥ आणिक

हीराजेअसती ॥ नेणोंकितीसुरनर ॥ ९ ॥ सुर्यवंशींचेंभूष
ण ॥ रामगावाकुलमंडण ॥ महादोषांचेंदंडण ॥ संरक्षण
दासाचें ॥ सूर्यवंशींवं० ॥ १० ॥

भूपाळी कृष्णाची.

उठोनियांप्रातःकाळीं ॥ म्हणतीगोपिकाबाळा ॥ आमुचा
गळाकापुनमगतूंजाईगोपाळा ॥ १ ॥ तुझियाविरहानळें
आम्हासहोतोउबाळा ॥ वसंतगेलामथुरेउद्धवआलाउन्हा
ळा ॥ २ ॥ पापीअक्रूरआलाजन्मांतरिंचावैरी ॥ भुरळ
घालुनघेउनगेलाआमुचाश्रीहरी ॥ ३ ॥ बराकिरेअक्रुरा
आपुलाबोलसाधिला।आडामध्येंघालुनसखयादोरकापिला
॥ ४ ॥ धिक्धिक्आमुचेंजिणेंजळोहेंलाजिरवाणें ॥ शेवट
गोडनकेलारेसखयागेलारेप्राण ॥ ५ ॥ अंधकूपांतूनकाढीं
सखयादीनोद्धारणा॥मध्वनाथशरणगताचीचिंतावारणा॥६

भूपाळी कृष्णाची.

उठींउठींबामुरारी ॥ दवडुनझोंपेच्यालहरी ॥ सूर्यउगवला
गगनोदरीं ॥ पूर्णदिशाफांकल्या ॥ १ ॥ ध्रु० ॥ आलेसखे
वनासिजाया ॥ जागृतहोईयादवराया ॥ पावनजनासि
कराया ॥ स्वरूपदावींआपुलें ॥ २ ॥ सभाबैसलीअंगणीं
॥ ऋषीबैसलेतारांगणीं ॥ उमाकांतसकळिकजनीं ॥ भक्ति

लागींपातले ॥ ३ ॥ त्र्यंबकसकळांसीकरजोडी॥ स्वानंदा-
चीउभवीगुढी ॥ संतबैसविलेप्रौढी ॥ अतिआवडीदर्शनाची
॥ उठिंउठिंबामुरारी ॥ दवडुं० ॥ ४ ॥

भूपाळी कृष्णाची.

आईमजकांह्मणसीवाईट ॥ व्यर्थचिएकुनबोभाट ॥ जेकां
जातातीआडवाट ॥ कर्मकपाटभोगितीते ॥ १ ॥ आपण
पडोनीभ्रांतींत ॥ माझीउगाचिनिंदाकरीत ॥ फेरेचौऱ्यांशीं
चेघेत ॥ अधोगतीजाताती ॥ २ ॥ लटिकाबोलेमाभळभट
॥ देवेंत्याचीझोडुनपाठ ॥ पळोनिगेलामथुरावाट ॥ तया
कायम्यांकेलें ॥३॥ अगबगप्रलंबधांदुनयेती ॥ मजलामारा-
याइछिती ॥ देवेंकेलीत्यांचीशांती ॥ तयाकायम्यांकेलें ॥४
अवघ्याव्रजांच्यागौळणी ॥ आपणभक्षितीगोरसलोणी ॥
सांगोंयेतीतुजलागोनी ॥ तयाकाय० ॥ ५ ॥ साधूसज्जन
मजलाध्याती ॥ शाश्वतपदींजाउनिरहाती ॥ तेथेंअक्षय
सुखभोगिती ॥ निरंतरसज्जनते ॥ ६ ॥ मातेमजलातुझी
आण ॥ किमपीअसत्यनाहींजाण ॥ करावेंमाझेंनामस्मर-
ण ॥ जीवनसुतविनवीतसे ॥ ७ ॥

भूपाळी कृष्णाची.

गौळणदशवंशींपैंसांगे ॥ आलियाकृष्णाचेनिमागें ॥ येगें

50488

येणेंहोश्रीरंगें ॥ नवनीतचोरिलेंमाझें ॥ १ ॥ उजवातळहा-
तेंकित ॥ डाव्यागुडघ्यानेंरांगत ॥ गवळयांघरींसारंगनाथ
॥ तोम्यांदेखिलासये ॥ २ ॥ एकेहातींलोण्याचाकवळू ।
मुखमांखिलेंसेअळुमाळू ॥ चुंबनदेतांअतिपरमळू ॥ नवनी
ताचागसये ॥३॥ येणेंमाझेंकवाडउघडिलें ॥ येणेंमाझेंशिकें
तोडिलें ॥ दह्यादुधातेंभक्षिलें ॥ लवंडिलेंतक्रातें ॥ ४ ॥
ऐसेंजरिमीजाणतें ॥ यमुनापाण्यानवजातें ॥ घरुनीउखळा
सीबांधित्यें ॥ शिक्षाकरावित्येंगोविंदा ॥ ५ ॥ ऐसापुराण
प्रसिद्धचोर ॥ ह्मणेंनामयाचादातार ॥ पंढरपुरींघेतलाअव
तार ॥ पुंडलिकाकारणें ॥ ६ ॥

भूपाळी विठ्ठलाची.

उठाउठाहोमुरारी ॥ बोलेरखुमाईसुंदरी ॥ भक्तगर्जती
महाद्वारीं ॥ त्यांसींद्यावेंदर्शन ॥ १ ॥ राउळींजागेजाह
लेहरी ॥ भक्तगर्जतीजयजयकारी ॥ नारदतुंबरकीर्तनकरी
प्रेमेंछंदेंडुल्लतसे ॥ २ ॥ सर्वपूजातुळसीपान ॥ घेउनआले
भक्तजन ॥ द्यावेंतयांसींदर्शन ॥ विलंबकांहींनकरावा॥३॥
ऐसाउगवलादिनकर ॥ भक्तगर्जतीजयजयकार ॥ तेथेंगणे
शनामाकिंकर ॥ हरिचरणावरलोळतसे ॥ ४ ॥

भूपाळीविठ्ठलाची.

उठाउठाप्रभातजाहली ॥ चिंताश्रीविठ्ठलमाउली ॥ दीनजनाचीसाउली ॥ येईधांउनीस्मरतांची ॥ १ ॥ पंढरपुरिंजेभीमातटीं ॥ सुंदरमनोहरगोमटी ॥ करद्वयठेउनीकटीं ॥ भेटीसाठींतिष्ठतसे ॥ २ ॥ किरीटकुंडलेंमंडित ॥ श्रीमुखअतिसुंदरशोभत ॥ गळांवैजयंतीडोलत ॥ हारमिरवितुळशीचा ॥ ३ ॥ सुरेखमूर्तीसगुणसांवळी ॥ कंठींकौस्तुभएकावळी ॥ केंशरउटीपरिमळेआगळी ॥ बुकाभाळींविलसतसे ॥ ४ ॥ पिंवळापीतांबरकासिलाकटीं ॥ अक्षयवीटचरणतळवटीं ॥ सकळसौंदर्यसुखाचीपेटी ॥ हृदयसंपुटींआठवावे ॥ ५ ॥ अतिप्रियआवडेतुळसीबुका ॥ प्रीतीकरीभोळ्याभाविकां ॥ नामापदपंकजपादुका ॥ शिरींमस्तकींवंदितसे ॥ ६ ॥

समाप्त.

पुरंदरे आणि कंपनीनें "श्रीकल्पतरु" छा० छापिलें.

सन १८९४, शके १८१६.



ST. MARY'S COLLEGE LIBRARY

V 891.461 R 50488
Bhu

AUTHOR —

TITLE Bhupalya.

DATE DUE | BORROWER'S NAME

V 891.461
Bhu
50488

Date Due